**<u>ठळक बातम्या</u>**

- एकोणऐंशीव्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी देशभर तयारी सुरु

- देशातल्या २८ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून २१० पंचायत प्रतिनिधींना नवी दिल्लीत होणाऱ्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याचं विशेष आमंत्रण

- इतर देशांच्या दबावाला बळी न पडता शेतकऱ्यांच्या हिताचे धाडसी निर्णय घेतल्याबद्दल देशभरातल्या शेतकऱ्यांनी मानले प्रधानमंत्र्यांचे आभार

- भारतीय वंशाच्या परदेशी नागरिकांना देण्यात येणाऱ्या परदेशी भारतीय कार्डाबाबात नियमांमध्ये बदल

**आणि**

- राजस्थानात रस्ता अपघातात १० जणांचा मृत्यू, तर ११ जण जखमी

**<><><><>**

स्वातंत्र्यदिन अवघ्या दोन दिवसांवर आला असून देशात आणि देशाबाहेरही त्याची जय्यत तयारी सुरू आहे. विविध ठिकाणी अनेक कार्यक्रम आयोजित केली असून संवेदनशील ठिकाणी कडक सुरक्षाव्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

हर घर तिरंगा अभियानांतर्गत आजपासून पुढचे तीन दिवस आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकावण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांच्या निवासस्थानी तिरंगा फडकावून या अभियानात सहभाग घेतला. या अभियानाला आता लोकचळवळीचं स्वरूप प्राप्त झालं असून यामुळे देशात एकतेचा संदेश जात असल्याचं शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात नमूद केलं.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर जम्मू भागात, विशेषतः पाकिस्तानच्या सीमावर्ती प्रदेशात सुरक्षाव्यवस्था वाढवण्यात आली आहे. जम्मूच्या सर्व १० जिल्ह्यांमध्ये हर घर तिरंगा अभियानासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत.

७९व्या स्वातंत्र्यदिनाच्या संचलनाची तयारीही सर्वत्र सुरू आहे. पुदुचेरीच्या बीच रोडवर या संचलनाची रंगीत तालीम आज घेण्यात आली.

स्वातंत्र्यदिनानिमित्त स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्रानं श्रीलंकेत कोलंबो इथं सांगीतिक कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका कविता कृष्णमूर्ती आणि व्हायोलिनवादक एल. सुब्रमण्यम यांचं सादरीकरण होईल.

<><><>

देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनाचं औचित्य साधून, तीनही सशस्त्र दलांनी तसंच तटरक्षक दल, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल आणि राष्ट्रीय छात्र सेनेनं देशभरात १४२ ठिकाणी विशेष वाद्यवृंद सादरीकरणाचं आयोजन केलं आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या गौरवार्थ तसंच देशवासियांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करण्यासाठी आणि ऑपरेशन सिंदूरचं यश साजरं करण्यासाठी १५ ऑगस्टला संध्याकाळी हे सादरीकरण केलं जाणार आहे. मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, गेटवे ऑफ इंडिया आणि हुतात्मा चौकात, पुण्यात शनिवारवाडा आणि गांधी राष्ट्रीय संग्रहालयाच्या परिसरात तसंच आणि नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर हे सादरीकरण पाहता येईल.

<><><>

देशातल्या २८ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून २१० पंचायत प्रतिनिधींना नवी दिल्लीत होणाऱ्या यंदाच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. आपापल्या गावात पायाभूत सुविधा, सार्वजनिक सेवा, आणि सामूहिक उपक्रम राबवून सुधारणा घडवणाऱ्या सरपंचांना विशेष पाहुणे म्हणून आमंत्रण देण्यात आलं आहे. यात महिला प्रतिनिधींची संख्या लक्षणीय आहे. हर घर नल जल योजना, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना आणि इंद्रधनुष अभियानात या प्रतिनिधींनी भरीव कार्य केलं असल्याचं पंचायती राज मंत्रालयानं म्हटलं आहे.

या प्रतिनिधींचा उद्या एका विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात येणार असून ”आत्मनिर्भर भारत, विकसित भारत की पहचान” अशी यंदाची संकल्पना आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सभा सार या अप्लिकेशनचं उद्घाटनही यावेळी होईल.

<><><>

व्यापार करारांबाबतच्या इतर देशांच्या दबावाला बळी न पडता शेतकऱ्यांच्या हितासाठी धाडसी निर्णय घेतल्याबद्दल देशभरातल्या शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. शेतकरी संघटनांचे नेते आणि शेतकरी यांनी काल केंद्रिय कृषी मंत्री

शिवराज सिंग चौहान यांची भेट घेऊन कृतज्ञता व्यक्त केली. बनावट खतं आणि रसायनं उत्पादन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी नवे कायदे करणार असल्याचा पुनरुच्चार चौहान यांनी यावेळी केला. शेतकरी केवळ भारताचेच नाही तर जगाचे अन्नदाते आहेत. त्यांची सेवा म्हणजेच ईश्वराची सेवा असं चौहान म्हणाले.

देशाच्या विविध भागातून शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येनं मेळाव्याला उपस्थित होते.

**<><><><>**

चौथी देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहीम यंदा नोव्हेंबर महिन्यात आयोजित केली जाणार आहे. फेस ऑथेंटिकेशन म्हणजे चेहऱ्यावरुन ओळख पटवणे या तंत्रज्ञानाचा वापर करून निवृत्तीवेतनधारकांच्या डिजिटल सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित केली जाणारी ही आतापर्यंतची सर्वात मोठी मोहीम आहे. देशभरातल्या अठराशे पन्नासपेक्षा जास्त जिल्हे, शहरं आणि तालुक्यांमध्ये ही मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती कार्मिक, सार्वजनिक गाऱ्हाणी आणि निवृत्ती वेतन मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात दिली आहे. दुर्गम भागातल्या निवृत्तीवेतन धारकांना जोडण्यासाठी निवृत्ती वेतन वितरण करणाऱ्या बँका, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक, निवृत्ती वेतन धारक कल्याण संघटना, रेल्वे अशा संस्थांच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जात आहे.

**<><><><>**

भारतीय वंशाच्या परदेशी नागरिकांना देण्यात येणाऱ्या परदेशी भारतीय कार्डाबाबत नियमांमध्ये केंद्रीय गृहमंत्रालयाने काही सुधारणा केल्या आहेत. एखाद्या ओसीआय नागरिकाला दोन वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त तुरुंगवासाची शिक्षा झाली असेल किंवा सात वर्षांपेक्षा जास्त तुरुंगवासाच्या शिक्षेसाठी आरोपपत्र दाखल झालं असेल तर त्या व्यक्तीचं परदेशस्थ नागरिकत्व रद्द केलं जाईल असं मंत्रालयानं म्हटलं आहे. गेल्या काही वर्षांमधे ओसीआय कार्डधारक नागरिकांचा गुन्ह्यांमध्ये अथवा देशविरोधी कारवायांमध्ये सहभाग असल्याचं आढळून आल्यानंतर गृह मंत्रालयानं नियमांमध्ये सुधारणा केल्या आहेत.

**<><><><>**

गाझापट्टीत युद्ध थांबवण्यासाठी आणि ओलिसांविषयी तोडगा काढण्यासाठी इजिप्तच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यासाठी हमासचं शिष्टमंडळ खलील अल

हया यांच्या नेतृत्वाखाली काल कैरो इथं पोहोचलं. साठ दिवसांच्या प्रस्तावित युद्धविरामाची अमलबजावणी करणं हा या वाटाघाटीचा हेतू आहे. इजिप्तच्या मध्यस्थीने ठेवलेल्या प्रस्तावात युद्धबंदी, गाझापट्टीतून सैन्य माघार, हमासच्या कैदेतील सर्व ओलिसांची सुटका आणि हमासच्या काही सदस्यांची हद्दपारी या अटी ठेवण्यात आल्या आहेत. या वाटाघाटींना अमेरिका आणि कतारचा पाठिंबा आहे. हमासच्या ताब्यातल्या ओलिसांची आणि पॅलेस्टिनी नागरिकांची सुटका करून युद्ध थांबवणं आणि कोणत्याही अटीशिवाय गाझापट्टीत मदत सुरू करणं हे चर्चेचं मुख्य उद्दिष्ट असल्याचं इजिप्तचे परराष्ट्र व्यवहार मंत्री बद्र अब्देल आती म्हणाले.

दरम्यान, युद्धबंदीची शक्यता इस्रायलचे प्रधानमंत्री बिन्यामीन नेतन्याहू यांनी फेटाळली आहे. हमासचा पराभव करून ओलिसांची सुटका करणं हेच अंतिम उद्दिष्ट असल्याचं नेतन्याहू यांनी स्थानिक माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<><><><>**

इस्रायलच्या हैफा, नेगेव, ईलत आणि बीर शेवा या शहरांवर ड्रोन हल्ले केल्याचं येमेनच्या हौथी गटाच्या लष्करी प्रवक्त्याने सांगितलं. नरसंहार, स्थलांतर आणि उपासमार करून पॅलेस्टिनी नागरिकांना संपवण्याच्या इस्रायलच्या कृत्याला प्रतिकार म्हणून हा हल्ला केल्याचं त्यांनी सांगितलं. इस्रायलने याविषयी प्रतिक्रिया दिली नाही.

**<><><><>**

राजस्थानच्या दौसा जिल्ह्यात आज झालेल्या अपघातात १० जणांचा मृत्यू झाला तर ११ जण जखमी झाले आहेत. दौसा मनोहरपूर महामार्गावर बसदी चौराहा इथं आज सकाळी एक टेम्पो आणि ट्रक एकमेकांवर धडकले. मृतांपैकी बहुतेक जण उत्तर प्रदेशातल्या एटाह जिल्ह्यातले रहिवासी होते आणि ते सिकर जिल्ह्यात खाटू श्याम जी मंदिरात दर्शन करून परतत होते. गंभीर जखमी झालेल्या आठ जणांना जयपूरमधल्या एसएमएस मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आलं आहे. तर इतर तिघांवर दौसा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><>**

तैवानमध्ये पोडुल चक्रीवादळ धडकण्यापूर्वी हजारो लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. पोडुल चक्रीवादळ आग्नेय दिशेकडे सरकत असून ते आज दुपारपर्यंत ताईतुंग शहराला धडकण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. तैवानमध्ये नऊ शहरांमध्ये आज शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. तसंच अनेक देशांतर्गत उड्डाणं ही रद्द केली आहेत.

**<><><><>**

ग्रीसमध्ये वनक्षेत्रात लागत असलेल्या वणव्यांमुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. वणव्यांमुळे नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात येत आहे. तर घरं, शेती आणि औद्योगिक सुविधांचं नुकसान होत आहे. ग्रीस मधे गेल्या २४ तासांत ८२ वणवे लागले असून त्यापैकी २३ वणवे अद्याप सक्रिय आहेत. जोरदार वाऱ्यांमुळे आग आणखी पसरत आहे. गेल्या काही आठवड्यांपासून ग्रीसला तीव्र उष्णता आणि दुष्काळाचा सामना करावा लागत आहे.

**//<><><><>//**